नियमीत फौजदारी खटला क्रमांक ७३०/२०१६
शासन विरुध्द मोनु उर्फ राजेंद्र मुल्लर यादव
निशाणी क्रमांक ०५

अभियोग पक्षाचा साक्षीदार क्रमांक १ ची जबानी
मी शपथेवर सत्य निवेदन करतो की

माझे नावः- भगवान हिरा गिरी
वयः- ४२ वर्षे धंदाः- चालक
रा. वरळी नाका प्रेम नगर वरळी मुंबई.
हल्ली रा. उदयपुर राजस्थान.

सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती भोसले यांच्याकडुन

१. सदर घटना दिनांक ०८/१२/२०२२ ते ०९/१२/२०२२ च्या रात्री आमच्या खोलीवर घडली. त्यावेळी आमच्या घरुन दोन मोबाईल चोरी झाले होते. ०८ तारखेला मी रात्रपाळी काम करुन पहाटे २.०० वाजता कामावरुन परत घरी आलो व झोपी गेलो. सकाळी उठुन पाहिले तर आमच्या घरात माझा व माझ्या पत्नीचा मोबाईल तिथे नव्हता. ते मोबाईल आम्ही झोपताना उशीजवळ ठेवले होते. त्यानंतर आम्ही शोध घेतला. त्यानंतर मी घटनेबाबत तक्रार दिली. ती तक्रार आता मला दाखवण्यात आली, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. ती तक्रार निशाणी क्रमांक ०६ वर आहे.

२. ते मोबाईल आम्हाला परत मिळाले नाही. ते मोबाईल पाहिल्यास मी ओळखु शकेन.
सरतपास पुर्ण.

उलट तपास आरोपीकरिता श्री. पुरंदरे, श्रीमती साक्षी साळुंखे यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९ अन्वये खालील प्रमाणे आदेश.

उलट तपास काही नाही.

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक २७/१०/२०२३

sd/-
महानगर न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्रमांक ६२ दादर,मुंबई

नियमीत फौजदारी खटला क्रमांक ७३०/२०१६
शासन विरुध्द मोनु उर्फ राजेंद्र मुल्लर यादव
निशाणी क्रमांक ०७

अभियोग पक्षाचा साक्षीदार क्रमांक २ ची जबानी
मी शपथेवर सत्य निवेदन करतो की

माझे नावः- टीना भगवान गिरी
वयः- ४५वर्षे धंदाः- मजुरी
रा. वरळी नाका प्रेम नगर वरळी मुंबई.
हल्ली रा. उदयपुर राजस्थान.

सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती भोसले यांच्याकडुन

१. सदर घटना मागच्या वर्षी दिनांक ०९/१२ ला रात्री आमच्या खोलीवर घडली. त्यावेळी आमच्या घरुन कोणीतरी मोबाईल चोरले होते. त्यावेळी मी दुध आणायला गेले होते. ते मोबाईल आम्ही किचन मध्ये चार्जींगला लावला होता. मी परत आले तेव्हा आमचे मोबाईल मिळुन आले नाही. त्यानंतर पोलीसांत तक्रार दिली होती.

२. ते मोबाईल पाहिल्यास मी ओळखु शकेन.

सरतपास पुर्ण.

उलट तपास आरोपीकरिता श्री. पुरंदरे, श्रीमती साक्षी साळुंखे यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९ अन्वये खालील प्रमाणे आदेश.

उलट तपास काही नाही.

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक २७/१०/२०२३

महानगर न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्रमांक ६२ दादर,मुंबई